18-19

SHIVAJI COLLEGE HINGOLI



University of Mumbai

DEPARTMENT OF Philosophy

# Buddhism and Gandhi

## Philosophy and Praxis

[An Anthology of Scholarly articles on Buddhism and Gandhi: Philosophy and Praxis from the 35th Session of the Maharashtra Tattvajnana Parishad]

Assistant Professor
Shivaji College Hingoli
Tq.& Dist.Hingoli (M.S.)

Editors:
Archana Malik-Goure and Meenal Katarnikar



Scanned with OKEN Scanner

SHIVAJI COLLEGE HINGOLI

Disclaimer: The present anthology contains research papers presented at the 35th Session of Maharashtra Tattvajnana Parishad on Buddhism and Gandhi: Philosophy and Praxis from 18th – 20th November 2018. The editors and publisher may or may not be agree with the views of the research paper writers published in this anthology. Individual authors are responsible for the authenticity of published matter of the research papers.

T.C

Lecturer
Shivaji College, Hingoli
Tq. Dist. Hingoli (MS.)

**Buddhism and Gandhi: Philosophy and Praxis**
(An Anthology of Scholarly articles on Buddhism and Gandhi)
Editors : **Archana Malik-Goure** and **Meenal Katarnikar**
Edition : November 2018
Printing : **Mumbai University Press, University of Mumbai**
Published by : **The Department of Philosophy, University of Mumbai**
Cover Page Design : **Prajakti Pai**

First Published: **November 2018**
**ISBN 978-93-85218-98-9**
Price: **Rs. 250/-**

Scanned with OKEN Scanner

SHIVAJI COLLEGE HINGOLI

## अणुक्रमाणिका

प्रस्तावना

१) मानवजातीपुढीलआजचीआव्हाने --ज.रा. दाभोले १
२) गौतम बुद्धांचावैज्ञानिकदृष्टीकोन—धनराजहाडुळे ११
३) गौतम बुद्धांचावैज्ञानिकदृष्टीकोन—बालाजीनरवाडे २३
४) गौतम बुद्धांचाअष्टांगिकमार्ग --प्रकाशधुमाळ २७
५) नितीमुल्यांचेमानवीजीवनातीमहत्व—सुनंदाभुसारे ३०
६) गौतम बुद्धांचीचारआर्यसत्येवअष्टांगिकमार्ग --धनराजलझडे ३५
७) स्वराज्यतेसुराज्य—राधीकापाठक ४०
८) गांधीजीआणिअस्पृश्यतानिवारण—सचिनखोक्ले ४२
९) गौतमबुद्धांचावैज्ञानिकदृष्टीकोन—सोनकांबळेगंगाधरसोपान ४८
१०) अल्बर्ट एलिस : एकतत्त्वज्ञ—संदीपकदम ५३
११) सावीत्रीबाई फुलेयांच्याजीवनकार्याचेतात्त्विकअधिष्ठान—विष्णुपवार ५८
१२) महात्मगांधींचीसत्यवअहिंसेचीसंकल्पना—शेडगे.व्ही. एस ६३
१३) अण्णाभाऊ साठेयांच्या 'बुदधाची शपथ' या कथेचा चिकित्सक परमार्श --सुनीलभिसे ६६
१४) गौतम बुद्धांचाविज्ञानवाद—सुनीलदत्तगवरे ७०
१५) महात्मागांधींचीसत्यवअहिंसेचीसंकल्पना–बाळासाहेबमुळीक ७३
१६) श्रीगोरक्षनाथांचेशिव-शक्तिसमरसताविचार—सुखदेवलोखंडे ७७
१७) ॲनीबेझंटवगांधीजी –शर्मिलावीरकर ८०
१८) Dimensions of Religious reformation movement in Maharashtra with Reference to BabasahebAmbedkars Conversion to Buddhism - SandeshWagh ८३
१९) Buddhist view on Women Asceticism --Archana Malik-Goure ९१
२०) An insight into M.K. Gandhi's journey of Truth through his Autobiography 'My Experiments with Truth'-- . NamitaNimbalkar ११२
२१) Scientific approach of Teachings of the Buddha: 'Mahā-RāhulovādaSutta' and 'MahāhatthipadopamaSutta' –BaljitLamba, ११९
२२) Women and lower cast in Buddhism -- AvinashWaghmare १२५
२३) Lingayat religion and Human unity --Nagshetty K Shetkar १२८
२४) Synthesis of Buddha's Ethical Path and Gandhiji's favorite Bhajan-- Mr. Manish Patel १३२
२५) Buddhism and the meaning of life: A study of the Buddha's concept of Nirvana -- AlokVerma १३६
२६) M.K. Gandhi's Practice of Constructive Programme in Champaran-- Ram Chet Yadav १४४
२७) Gandhi's Message of Peace-for Lawyers and everyone in general -- DhanshreeVhatkar १५२
२८) Gandhian Philosophy on Truth and Non-violence – LataNaik १५८
२९) Buddhism and Gandhi –SaritaBapat १६५
३०) Comparative study of Patanjali'sChaturyuha and Buddha's four Noble Truths -- HetalAshar १७१
३१) Satya and Ahimsa -- Ashok Kumar Mishra १८२
३२) Role of Sati in the kamma of Budhisatta--Modak.N.B. १८७
३३) Concept of Brahmaviharasin Yoga Philosophy and its Impact on Mind -- Shivani Singh १९१
३४) Mahatma Gandhi and Bhakti --Sunita Vyas १९५

T.C
Lecturer
Shivaji College,Hingoli
Ta & Dist.Hingoli (MS.)

Scanned with OKEN Scanner

# नीतिमूल्यांचे मानवी जीवनातील महत्त्व

प्रा. डॉ. भुसारे सुनंदा रामचंद्र
तत्त्वज्ञान विभाग प्रमुख
शिवाजी महाविद्यालय, हिंगोली.

**प्रस्तावना:- (Introduction)**

सद्य कालीन सामाजिक स्थितीचा विचार करता सर्वच क्षेत्रात मानवाने भरघोस यश मिळविले आहे. आज भौतिक सुख, सुविधांच्या बाबतीत मानवाने प्रगतीचे अतिउच्च शिखर गाठले आहे. जग मुठीत केले आहे. पृथ्वीच्या एका टोकापासून दुसऱ्या टोका पर्यंतचे अंतर हाकेच्या अंतर एवढे झाले आहे. पण मानवाने कितीही प्रगती केली असली तरी त्याला या भौतिक सुखामुळे मानसिक समाधान लाभने मात्र शक्य नाही. प्रगत माणसाची मानसिक भूक मात्र या प्रगतीमुळे पूर्ण होऊ शकत नाही. शाश्वत सुखासाठी, निरंतर प्रगतीसाठी मात्र त्याला नैतिकतेची कास धराविच लागते.

मानव हा विचारशील प्राणी आहे. त्यामुळे नैतिक जबाबदारीची जाणिव असणे त्याची ओळख आहे. नीतिमूल्यांची जोपासना करणे हे मानवी संस्कृती टिकविन्यासाठी, वृध्दिंगत करण्यासाठी उपयुक्त ठरते. इतर प्राण्यांपेक्षा वेगळा असलेला मानव प्राणी हहे करु शकतो. म्हणून त्याची सांस्कृतिक वाटचाल यशस्वीपणे आज पर्यंत झाली आहे. सामाजिक स्वास्थ टिकविण्यासाठी नीतिनियम, रुढी, परंपरांची कास त्याने धरुन ठेवली आहे.

**सद्य परिस्थितीत नीतिमूल्यांचे स्थान:-**

जेव्हापासून माणूस टोळ्या टोळ्यांनी राहण्यास शिकला तेव्हा पासून नीतिची सुरूवात झाली. टोळयांच्या व्यवस्थापनासाठी टोळी व्यवस्थापकाने काही नियम पाळणे सर्वांनाच बंधनकारक केले. त्या नियमांचे पालन सर्वांनीच विना तक्रार काही कालखंडापर्यंत केले. पण जेव्हा प्रत्येकजण विचार करावयास लागला आहे. तेव्हा काही जणांच्या मनाने या नियमा विरुध्द बंड केले सर्व नियम आजही पालन करणे आवश्यक आहे काय? त्याती बरेचसे नियम कालबाह्य झाले नसतील का? मग ते आम्ही आजही का पाळावेत? असे अनेक प्रश्न विचारले जावू लागले. याचा परिणाम असा झाला की, कालबाह्य नियम जरी बाजूला टाकले तरी नवीन नियमांचे पालन करणे मात्र सर्वांना बंधनकारक झाले.

T.C
Lecturer
Shivaji College,Hingoli
Tq.& Dist.Hingoli (MS.)



Scanned with OKEN Scanner

नीतिचे पालन ही अता सवय झाली. म्हणून नीतिशास्त्र म्हणजे ...
परंपरांचा अभ्यास करणारे शास्त्र." अशी एक व्याख्या केली गेली. मानव समाजामध्ये त्या-त्या समाजाचे अस्तित्व टिकविण्यासाठी वेगवेगळे नीतिनियम तयार केले गेले. त्यातूनच मूल्यांची जोपासना केली जाते. शुध्द आचरण, समाजशीलता, मानवतावाद, स्त्री-पुरुष समानता, स्वातंत्र्य, समता, बंधुता, सामजिक ऐक्य ही सामाजिक, नैतिक मूल्य आहेत. जो समाज नैतिक मूल्यांची जोपासना करतो तो समाज तेवढ्याच प्रगतीच्या, यशाच्या उंच शिखरावर जावून पोहचतो. आजच्या सामाजिक स्थितीचा विचार करत असताना एक गोष्ट लक्षात येते, की आज सामाजिक स्थैर्य दिसून येत नाही. सुखवस्तू समाजाला सुखोपभोगाची लालसा लागल्यामुळे सतत सुखाच्या शोधात राहणे आजचा समाज पसंत करतो आहे. प्रसिध्दी, पैसा, सुखलोलूपता यामुळे विवेक बाजूला सारला गेला आहे. एक दुसऱ्या प्रति आदर बाळगणे, समाजाचे अपल्यावर ऋण आहे ही जाणीव ठेवणे आज कालबाह्य झाले आहे. सामाजिक सलोखा, सामाजिक बांधिलकीचा विसर पडला आहे. कुपमंडूक वृत्ती सवर्त्र दिसून येत आहे. स्वार्थी वृत्तीची वाढ झाली आहे. हे दृष्य जरी सर्वत्र दिसून येत असले तरी अनेक समाज सुधारकांनी आपली जीवनमूल्य सामाजिक बांधिलकी प्राणपणाने जपली, जोपासली आहे. त्यांनी स्त्री-शूद्रांसाठी कार्य केले आहे.

समाजातील मागास, दूर्लक्षित, पीडित लोकांच्या प्रति आपली नैतिकता जागवणे गरजेचे ठरते. महिलांवर होणारे अत्याचार, बालमजुरांचे प्रश्न, बाल गुन्हेगारीची समस्या सामाजिक नीतिमूल्यांची जाणिव इ. प्रश्ना बाबत विचार मंथन होणे गरजेचे असते.

आज नीतिशास्त्र ही तत्वज्ञानाची एक महत्वपुर्ण शाखा म्हणून त्याकडे पाहिजे जाते. भारतीय तत्वज्ञानात जैन, बौध्द, चार्वाक यासारख्या दर्शनानी तर पाश्चात्य तत्वज्ञानात प्लेटो, ॲरिस्टॉटल, स्पिनोझा, कांट, मिल यांनी नीतिशास्त्रीय विचारात मोलाची भर घातल्याचे दिसून येते माणसाने कसे वागावे ? त्याचे इतरांशी संबंध कसे असावेत ? त्याने कोणत्या प्रकारची कृत्य केली पाहिजेत ? या विषयीचे निकष लावण्याचा प्रयत्न या नीतिशास्त्रात केला जातो. म्हणजेच माणसाचे कल्याण कशात आहे ? त्याची कर्तव्य कोणती ? त्या माणसाचे चारित्र्य कसे असावे ? कल्याण आणि कर्तव्य या दोन्हीतील संबंध काय ? याचे ज्ञान प्राप्त करुन देण्याचे प्रयोजन नीतिशास्त्रात असते.

T.C

Lecturer
Shivaji College, Hingoli
Tq.& Dist.Hingoli (MS.)



Scanned with OKEN Scanner

SHIVAJI COLLEGE HINGOLI

नीतिशास्त्राचा व्युत्पती अर्थ पाहत असताना इंग्रजीतील Ethics हा ग्रीक भाषेतील Ethos या शब्दापासून तयार झाला आहे. याचा अर्थ चालीरिती, रुढी, परंपरा असा होतो. त्यामुळे नीतिशास्त्र हे व्यक्तीच्या सवयींचा, चालीरितींचा अभ्यास करणारे शास्त्र असे म्हणावे लागते.

Ethics ला इंग्रजीत Moral Philosophy असेही म्हणतात. Moral हा लेटीन शब्द Mores या शब्दापासून तयार झाला आहे. याचा अर्थ रुढी, सवयी असा केला जातो. म्हणून 'नीतिशास्त्र म्हणजे रुढी चालीरिती किंवा सवयींचा अभ्यास करणारे शास्त्र' अशी प्राथमिक व्याख्या तयार केली गेली.

"पॉल्सन :- नेही याच पध्दतीची व्याख्या केल्याचे दिसून येते' रुढी किंवा नैतिकतेचे शास्त्र म्हणजे नीतिशास्त्र होय.

मॅकेन्झी :- यांच्या मते नीतिशास्त्र म्हणजे आचरणाची इष्टता किंवा योग्यते संबंधी एक चिकित्सा होय"[1].

वरील व्याख्याचा विचार केला असता या व्याख्यांचा अभ्यास विषय हा मानवी आचरण हा आहे. मानव समाजशील असल्यामुळे आदर्श आचरणाची विचारांची मानवाला पर्यायाने समाजाला गरज असते. त्या अनुशंगाने नीतिशास्त्रात आचरणाचा आदर्शात्मक किंवा मूल्यात्मक विचार केला जातो. तत्वचिंतक सु.वा. बखले यांच्या मते, "नीतिविषयक म्हणजे आचरणविषयक चिकित्सा अथवा विचार करणे नैतिक तत्वज्ञानाचा उद्देश असतो. हा विचार अथवा चिकित्सा मूल्यात्मक असून त्यात मूल्यात्मक संकल्पनांचा उपयोग करण्यात येतो. म्हणजेच नैतिक तत्वज्ञान आचरणाविषयी चिकित्साकरुन अभिप्राय देत असते"[2]

नीतिशास्त्र हे मानवी जीवनामध्ये अत्यंत गरजेचे शास्त्र आहे. कारण त्याशिवाय मानव जीवन जगू शकंत नाही. मानव समाज हा इतर प्राण्यापेक्षा वेगळा समजला जातो तो त्यामुळेच होय. कारण तो विवेकी आहे. त्याला सद्विचार, सद्वर्तन करता येते. इतर प्राण्याना विचार करण्याची शक्ती नसल्यामुळे ते स्वत:बद्दल किंवा इतराबद्दल विचार करु शकत नाही. इष्ट-अनिष्ट चांगले-वाईट, योग्य-अयोग्य

Lecturer
Shivaji College,Hingoli
Tq.& Dist.Hingoli (MS.)



Scanned with OKEN Scanner

याबद्दल त्यांना कल्पना नसते. त्यामुळे विवेकी भावनेचा प्रश्नच उद्‌भवत नाही. नीतिशास्त्र हे व्यक्तीच्या असरणाचा अभ्यास करणारे शास्त्र आहे, त्यावर नीतिनिर्णय देणारे शास्त्र आहे. म्हणून नीतिशास्त्र हे विवेकी शास्त्र होय असे आपल्याला म्हणता येते.

SHIVAJI COLLEGE • HINGOLI •

मानवी जीवनाचा विचार करत असताना मानवेच्या जीवनामध्ये अनेक संकटे उद्भवतात त्यांना सामना करण्यासाठी मानवाला नीतिच्या मार्गदर्शनाची गरज भासत असते. मानवी जीवन अनुभवांनी समृध्द करण्याचे काम नीतिशास्त्र करत असते. म्हणून मानवी जीवनात नीतिची गरज भासते. आजच्या धकाधकीच्या जीवनामध्ये अनैतिकता बोकाळलेली आपल्याला दिसून येते. समाजामध्ये सर्वत्र अनितीमान लोकांचे साम्राज्य आपल्याला दिसत आहे. हा समाजा समोरील गंभीर प्रश्न म्हणावा लागतो. म्हणून आजच्या प्रशासनाला नीतिमूल्याचे, मूल्यशिक्षणाचे धडे शालेय वर्गापासून देण्याची गरज भासत आहे.

समाजाने निमार्ण केलेले नीतिनियम समाजाचा व्यवहार व्यवस्थितपणे चालवण्यासाठी असतात पण आज त्या नियमांचे सतत उल्लंघन होताना दिसते आहे. सुरक्षित व सुव्यवस्थित समाजाच्या वाटचालीसाठी नीति गरजेची आहे हे मान्यच करावे लागते. जीवनातील अनेक प्रसंग असे असतात की त्या प्रसंगी व्यक्ती ठामपणे निर्णय घेवू शकत नाही. तिच्यासमोर धर्म संकट निर्माण होते. उदा. आपले आप्तस्वकीय, मित्र, गुरु यांच्याशी युध्द करावे की करु नये कारण युध्द केले तर हे सर्व आपले सगेसोयरे आपल्याकडून निश्चितपणे मारले जाणार हे अर्जुनाला माहित होते. आणि माघार घ्यावी तर क्षत्रिय धर्म मोडल्याचे पाप लागणार होते. असे धर्म संकट सामान्य माणसाच्या जीवनात सतत निर्माण होत राहते. तेव्हा नीतिच्या मदतीने त्याची सोडवणूक करण्याचा प्रयत्न सामान्यमाणूस करतो.

चारित्र्य निर्मितीसाठी नीतिची गरज असते. भारतीय समाज जीवनामध्ये चारित्र्य संपन्न व्यक्तीला महत्वाचे स्थान असते. भारतीय नीतिच्या बहु-तेक संकल्पना ह्या मानवी चारित्र्याशी संबंधीत आहेत. व्यक्तीने आपल्या जीवनामध्ये चारित्र्य संपन्न असावे हे भारतीय नीतिशास्त्राला अपेक्षित आहे. त्यामुळे सामान्य व्यवहारामध्ये नैतिक आचरणावर भर देण्यात आलेला दिसून येतो.

T.C.

Lecturer
Shivaji College,Hingoli
Tq.& Dist.Hingoli (MS.)

T.C.

Assistant Professor
Shivaji College,Hingoli.
Tq.& Dist.Hingoli.(MS.)



Scanned with OKEN Scanner